पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक 13 ]

दिनांक : 08/2/2017 वेळ : दुपारी 12.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे फेबुवारी 2017 ची मासिक सभा बुधवार दिनांक 08/2/2017 रोजी दु. 12.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. पांढरकर निलेश शंकरराव | सभापती |
| 2. | मा. पात्रे राम संभाजी | सदस्य |
| 3. | मा. बाबर शारदा प्रकाश | सदस्या |
| 4. | मा. उल्हास शेटटी | सदस्य |
| 5. | मा. भारती फरांदे | सदस्या |
| 6. | मा. जावेद शेख | सदस्य |
| 7. | मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर | सदस्या |
| 8. | मा. नंदा विकास ताकवणे | सदस्या |
| 9. | मा. काळभोर वैशाली जालिंदर | सदस्या |

तसेच श्रीम. आशादेवी दुरगुडे- मा. क्षेत्रीय अधिकारी, श्रीम.रेखा गाडेकर– प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री. महादेव शिंदे–सहा. आरोग्याधिकारी, श्री. सोनकुसरे अरुण–अतिक्रमण पथक प्रमुख, श्री. संजय देसाई, मुख्य आरोग्य निरिक्षक, श्री.डी.एस.सासवडकर, मुख्य आरोग्य निरिक्षक, इ. उपस्थित होते.

मा. सभापती, श्री. पांढरकर निलेश यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

त्यानंतर मागील सभेचा सभावृत्तांत [ दि. 31/12/2016 विशेष सभा कार्यपत्रिका क्रमांक 11 व दिनांक 02/01/2017 प्रभाग समिती मासिक सभा कार्यपत्रिका क्रमांक 12] वाचून कायम करणेत आला. मा. सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांकः- (१) क्षेत्रीय अधिकारी, अ-क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र.अ.क्षे.का./आ.(२) /कावि/२८८/२०१७ दिनांक ८/२/२०१७ चे प्रस्तावानुसार - केंद्र शासनाने दिनांक २ ऑक्टोंबर २०१४ ते २ ऑक्टोंबर २०१९ या पाच वर्ष कालावधीसाठी म्हणजेच महात्मा गांधी यांचे १५० व्या जयंतीपर्यंत स्वच्छ भारत मिशन (नागरी) राबविण्याची घोषणा केली आहे. याच धर्तीवर राज्य शासनाने स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) राबविण्याचा निर्णय घतला आहे. या अंतर्गत राबविणेत येत असलेल्या स्वच्छतेच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची म्हणजेच महानगरपालिकांची आहे. त्यानुसार शासनाचे वेळोवेळी प्राप्त होणा-या सुचनांनुसार स्वच्छतेचे विविध उपक्रम राबविणेत येत आहेत. यामध्ये नागरिकांचे सहकार्याने सार्वजनिक स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन व शहर हगणदारीमुक्त करणे याचा समावेश आहे. शासनाकडील प्राप्त सुचनांनुसार ३१ मार्च २०१७ पर्यंत शहर टप्प्या-टप्प्याने हगणदारीमुक्त जाहिर करण्याचे उद्दीष्ट ठेवणेत आले आहे. शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्र. डी ओ. क्र. Z-11021/4/2016 – SBM – II Dt. 2/3/2016 व 16/3/2016 तसेच MD-

SBM/AA/22/2016 Dt. 17/3/2016 नुसार शहर / वॉर्ड हगणदारीमुक्त जाहीर करणे व त्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती यानुसार अ-क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. १० (तुळजाईवस्ती अजंठानगर), १८ (किवळे), २५ (चिंचवड स्टेशन– आनंदनगर) व २७ (मोरवाडी) हगणदारीमुक्त जाहीर करणेबाबतची कार्यवाही करणेत आलेली आहे. यास्तव सदरचे प्रभाग हगणदारीमुक्त जाहिर करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करणेत आला.

ठराव क्रमांकः- १०१ विषय क्रमांकः- १

दिनांकः- ८/२/२०१७ विभागः-आरोग्य

सुचकः- उल्हास शेट्टी अनुमोदकः-नंदा विकास ताकवणे

संदर्भः- क्षेत्रीय अधिकारी, अ-क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र. अ.क्षे.का./आ.(२)/कावि/२८८/२०१७ दिनांक ८/२/२०१७ चा प्रस्ताव- केंद्र शासनाने दिनांक २ ऑक्टोंबर २०१४ ते २ ऑक्टोंबर २०१९ या पाच वर्ष कालावधीसाठी म्हणजेच महात्मा गांधी यांचे १५० व्या जयंतीपर्यंत स्वच्छ भारत मिशन (नागरी) राबविण्याची घोषणा केली आहे. याच धर्तीवर राज्य शासनाने स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) राबविण्याचा निर्णय घतला आहे. या अंतर्गत राबविणेत येत असलेल्या स्वच्छतेच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची म्हणजेच महानगरपालिकांची आहे. त्यानुसार शासनाचे वेळोवेळी प्राप्त होणा-या सुचनांनुसार स्वच्छतेचे विविध उपक्रम राबविणेत येत आहेत. यामध्ये नागरिकांचे सहकार्याने सार्वजनिक स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन व शहर हगणदारीमुक्त करणे याचा समावेश आहे. शासनाकडील प्राप्त सुचनांनुसार ३१ मार्च २०१७ पर्यंत शहर टप्प्या-टप्प्याने हगणदारीमुक्त जाहिर करण्याचे उद्दीष्ट ठेवणेत आले आहे. शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्र. डी ओ. क्र. Z-11021/4/2016 – SBM – II Dt. 2/3/2016 व 16/3/2016 तसेच MD-SBM/AA/22/2016 Dt. 17/3/2016 नुसार शहर/वॉर्ड हगणदारीमुक्त जाहीर करणे व त्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती यानुसार अ-क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. १० (तुळजाईवस्ती अजंठानगर), १८ (किवळे), २५ (चिंचवड स्टेशन – आनंदनगर) व २७ (मोरवाडी) हगणदारीमुक्त जाहीर करणेबाबतची कार्यवाही करणेत आलेली आहे. यास्तव सदरचे प्रभाग हगणदारीमुक्त जाहिर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

त्यानंतर मा. सभापती श्री. निलेश पांढरकर यांनी प्रस्तुतची सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-

(निलेश शंकरराव पांढरकर)
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /11/कावि/1173/2017

दि. 10/02/2017

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती
निगडी - ४४

प्रति,

सर्व संबंधित विभाग